**अहिल्यानगर जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग**

---

**ई-निविदा सूचना सन- २०२५-२०२६**

**निविदा क्र. --------------/कामे/लेखाशिर्ष - २५१५-१२३८**

**मा.लोकप्रतीनीधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील मुलभूत सुविधा पुरविणे.**

**पहिली वेळ**

मा.अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प. अहिल्यानगर यांचेमार्फत **सार्वजनिक बांधकाम (दक्षिण)**विभाग अंतर्गत मंजुर असलेल्या खालील तक्या नमुद केलेल्या कामाच्या निविदा नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ई-निविदा कार्यप्रणाली व्दारे ऑनलाईन टक्केवारी नुसार ब-१ निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचेनाव | निविदा रक्कम | निविदा शुल्क (जीएसटी सह) | **बयाणा रक्कम (निविदा रकमेच्या १%)** | कंत्राटदाराचा वर्ग | काम पुर्ण करावयाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **मौजे चिंचोली गावठाण अंतर्गत बांगरवाडी, घोडवाखारेवस्ती, झंजाड रोड अंतर्गत कॉंक्रिटीकरण करणे.** | 1205329 | 1180 | 19367 | खुला | 03 Month |

**ई निविदा भरण्याकरीता सामान्यसूचना :-** वरील तक्त्या मधील मागविण्यात आलेल्या कामाच्या ई निविदा, ग्रामविकास विभाग / जिल्हा परिषदेकडे खालील तक्यांत नमुद केलेल्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे मागविण्यात येत आहेत.ई निविदा भरण्याकरीता सामान्य सूचना महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळhttp://mahatenders.gov.inवर दिलेल्या आहेत.

**कंत्राटदाराची नोंदणी**:-ई निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी इच्छुक कोणत्याही कंत्राटदाराने कोणत्याही जिल्हा परिषदेमध्ये किंवा महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाकडील नोंदणी असणे आवश्यक असुन त्याचा नोंदणी वर्ग व प्रवर्गानुसार महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळhttp://mahatenders.gov.inमार्फत ई निविदा भरण्यात यावी.

**डिजीटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (DSC) :-** प्रत्येक कंत्राटदारास वर नमुद केलेल्या वर्ग व प्रवर्गानुसार ई निविदा भरण्यासाठी डिजीटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (**DSC**)आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्रासाठी लागणारी रक्कम भरल्यानंतर मान्यता प्राप्त नॅशनलइंफॉरमॅटिक सेंटर (NIC) यांचे कडुन देण्यात येते, प्रमाणपत्राची तपशीलवार माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. डिजीटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (**DSC**) हे युएसबीई -टोकन स्वरुपामध्ये देण्यात येते.

**निविदा कागदपत्रांचे जमा करणे:-**१)ठेकेदार डिजीटल स्वाक्षरी प्रमाणपत्र वापरुन नमुद केलेल्या संकेतस्थळावर लॉग इन करुन इंटरनेट वरुन एनआयटी व निविदा कागदपत्रे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने शोधुन व डाउनलोड करु शकतात. निविदा भरून कागदपत्रे सादर करण्याचा हा एकमेव मार्ग आहे.

२) एका पेक्षा जास्त कामांमध्ये भाग घेण्याची शक्यताः सामान्यतः कोणताही कंत्राटदार त्याच्या काम करण्याची ऐपत आणि आर्थिक क्षमतेनुसार कोणत्याही एनआटीमध्ये जास्तीत जास्त काम करण्याची निविदा सादर करु शकतो.

**निविदा सादर करण्याची प्रक्रियाः-** १)निविदा भरण्याच्या अंतिम दिनांक व वेळे पूर्वी निविदा दोन लिफाफ्यामध्ये म्हणजे तांत्रिक लिफाफा आणि आर्थिक लिफाफा ऑनलाईन पद्धतीने सादर करावयाच्या आहेत.

२)सदर निविदा अपलोड करताना डीजीटल स्वाक्षरी प्रमाणपत्र वापरुन, विहित स्कॅन करुन डिजीटल स्वाक्षरी केलेले कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे, सदर कागदपत्रे स्वयंचलितपणे वाचनीय स्वरूपात असावेत.

३) जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत यापुर्वी हाती असलेली विविधविकास कामे , विहित मुदतीत अथवा प्रथम वाढीव मुदत वाढकालावधी मध्ये पुर्ण केलेली नाहीत या कारणास्तव सदर कामाचे निविदेमध्ये कोणत्याही टप्प्यावर अपात्र करणेत येईल याची नोंद घ्यावी. याबाबत सोबतच्या नमुन्यातील प्रतिज्ञापत्र निविदाधारकास सादर करणे बंधनकारक आहे.

४) निविदा अटी व शती मधीलविवरणपत्र १ ते ४ STATEMENT NO 1 TO 4 , DECLARATION OF THE CONTRACTOR सादर करण्यात यावे. तसेच काळया यादीत नाव नसलेबाबतचे प्रतिज्ञापत्र व अपुर्ण कामे नसलेबाबतचे प्रतिज्ञापत्र सादरकरणे आवश्यक आहे.

- **निविदा भरण्याचीकार्यपध्दती** :-

- **तांत्रिक लिफाफाः-**

१. निविदाधारकांनी निविदा फी व १ टक्के बयाणा रक्कमही स्वतःच्या बँकखात्यामधुन ऑनलाईन नेट बँकींग व्दारे भरणा करणे बंधनकारक आहे. व ती भरणा केल्याची बँक स्टेटमेंट स्कॅन करुन अपलोड करणे बंधनकारक आहे.
निविदा शुल्क व ईएमडी रक्कम चुकीची आढळल्यास निविदा अवैध मानले जाईल.

२. निविदाधारकांनी निविदा सादर करताना कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र अपलोड करणे बंधनकारक राहील.

३. निविदाधारकांनी निविदा सादर करताना पॅनकार्ड व जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र अपलोड करणे बंधनकारक राहील. तसेच मागील आर्थिक वर्षाचे Income Tax Return व GST Return दाखल केल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

४. निविदेसोबत ऑनलाईन अपलोड केलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे शपथपत्र रक्कम रुपये १००/-च्या स्टॅम्प पेपर वर सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात (कामाचे नावासह समान भाषेत )सत्य प्रतिज्ञापत्र ( Affidavit ) स्वसाक्षांकित करुन स्वतंत्र अपलोड करणे बंधनकारक राहील. सदर प्रतिज्ञापत्राची मूळ प्रत करारनाम्या सोबत जमा करणे बंधनकारक राहील.

**५.** कॉंक्रीट रस्त्याच्यांकामाकरीता मोबाईलकॉंक्रीट मिक्सर / आरएमसी प्लँट / व्हायब्रेटर / ट्रीमिक्स मशिन तसेच इमारतीच्या कामा करीता कॉंक्रीट मिक्सर व नीडल व्हायब्रेटर व डांबरीकरणाच्या कामा करीता पेव्हर, रोलर, डांबर प्लँट इ. बाबतचे स्वमालकीची कागदपत्रे किंवा भाडे तत्वावर असल्यास रुपये १००/-च्या स्टॅम्प पेपरवर भाडे करारनामा निविदा कालावधीतील असावा तसेच त्यामध्ये कामाचे नाव नमुद करुन प्रत अपलोड करावी. कामाची साईट तेडांबर प्लँट यामधील अंतर ६० कि.मी. पर्यंत असावे याबाबत गुगल मॅप अपलोड करणे बंधनकारक राहील.**तसेच महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय दिनांक ११/०५/२०२२ अन्वये रुपये ५०.०० लक्ष पर्यंतच्या रस्ते डांबरीकरण, पुल व इमारती कामासाठी स्वतःच्या मालकीची मशिनरी असल्याची अट नाही, परंतु रु ५०.०० लक्ष पुढील रक्कमेच्या कामासाठी स्वतःच्या मालकीची मशिनरी असणे आवश्यक आहे.**

६. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम शासन निर्णय दि.२१/०९/२०२३ अन्वये सर्व नवीन प्लांट व मशिनरी प्रथम उभारणी केल्या नंतर तसेच जुनी यंत्र सामुग्री नविन जागेवर स्थलांतरित केल्यास त्यास सहाय्यक मुख्य अभियंता (यांत्रिकी) यांचे प्रमाणपत्र बंधनकारक राहील.

७. निविदा धारकाने रुपये एक कोटी निविदा रक्कमे पेक्षा जास्त रकमेच्या कामासाठी खालील प्रमाणे पोस्ट क्वालिफिकेशन क्रायटेरिया राहील.

अ) मागील ५ वर्षातील कंत्राटदाराची कमाल उलाढाल :- देय असलेल्या कामाच्या वार्षिक किंमतीच्या कमीत कमी ७५ टक्के इतकी असावी.(वार्षिक किंमत)- (कामाची एकुण किंमत)

-----------------------

(कामाचा कालावधी वर्षात)

ब) अ) तीन सारख्या पध्दतीची कामे ज्यांची काम निहाय किंमत, बोलावण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रक्कमेच्या ४० टक्के पेक्षा कमी नसावी.

किंवा

ब) ब) दोन सारख्या पध्दतीची कामे ज्यांची काम निहाय किंमत , बोलावण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रकमेच्या ५० टक्के पेक्षा कमी नसावी.

किंवा

ब) क) एक सारख्या पध्दतीची कामे ज्यांची काम निहाय किंमत , बोलावण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रकमेच्या ८० टक्के पेक्षा कमी नसावी.

क) देय कामासाठी मागील ५ वर्षापैकी कोणत्याही एका वर्षात ज्या महत्वाच्या परिमाणाच्या बाबी करावयाच्या आहेत त्याचे कमीत कमी परिमाण :- देय कामातील महत्वाच्या बाबींच्या परिमाणाच्या ३० टक्के

ड) कंत्राटदाराची निविदा भरण्याची सक्षमता (बीड कपॅसिटी) (अे = एन = २) - बी जेथे अे - गेल्या ५ वर्षातील कमीत कमी वार्षीक उलाढाल (चालू दराने) एन - देय कामाचा कालावधी बी - हातातील कामांची किंमत (देय कामांच्या कालावधीतील)

इ) देय कामाच्या विशिष्ट स्वरूपानुसार समकक्ष काम कंत्राटदारांनी प्रत्यक्ष केलेले असणे अनिवार्य आहे

उदा. १) बहुमजली इमारतींच्या बांधकामा बाबत विशिष्ट व वेगळया तंत्रज्ञानाचा वापर करणे अपेक्षित असल्याने किमान तळ मजला अधिक वरील काही मजले अशा स्वरुपाच्या इमारतीचे बांधकाम वरील मजल्यांची संख्या क्षेत्रीय स्तरावर विहित करण्यात यावी.

२)पाईल फाउंडेशनचे काम.

३) पुलाच्या बांधकामाच्या नियोजित स्वरूप नुसार तशा पुलाचे बांधकाम इत्यादी.

फ) देय कामांसाठी कंत्राटदाराकडे उपलब्ध असावयाची स्वतःच्या मालकीची यंत्रसामुग्री व प्रकल्प व्यवस्थापना बाबतची व्यवस्था याचे निकष मुख्य अभियंता यांनी प्रत्येक प्रकरणी तपासणी करून निश्चित करावी.

८. सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजुर सहकारी सोसायटी यांनी आरक्षित कामात भाग घेताना सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी निविदेच्या आर्थिक वर्षात आरक्षणा व्दारे रुपये ७५ लक्ष मर्यादे पेक्षा व मजुर सहकारी सोसायटी यांनी रुपये ५० लक्ष मर्यादे पेक्षा जास्त काम न मिळाल्या बाबतचे सेल्फ डिक्लेरेशन रुपये १००/- च्या स्टँप पेपरवर ॲफेडेव्हीट करुन अपलोड करावे. सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजुर सहकारी सोसायटी यांना आरक्षित कामात भाग घेताना सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजुर सहकारी सोसायटीही अहिल्यानगर जिल्हयातीलच असावी.

९. बीड कॅपॅसिटी- रुपये ५०.०० लक्षकिंमतीच्या वरील सर्व कामांसाठी बीड कॅपिसिटीची अट लागु राहील. तथापि एकाच कंत्राटदाराने एका वित्तीय वर्षात तीन किंवा त्यापेक्षा जास्त कामे घेतली असल्यास त्याच्यासाठी त्या वत्तीय वर्षात पुढील निविंदासाठी बीड कॅपिसीटीची शर्त लागू राहील. याबाबत खातरजमा करण्यासाठी लिफाफा क्रं. १ मध्ये चालू वित्तीय वर्षात हाती घेतलेल्या सर्व कामांची निविदा विषयक माहिती सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. बीड कॅपिसिटी परिगणितकरतांना( अे ×एन × २) - बी या प्रमाणे परिगणित करण्यात येईल. सनदी लेखापाल यांचे कडील

मागील **५** वर्षातील कंत्राटदाराची कमाल उलाढाल निविदेतील कामाच्या वार्षिक किंमतीच्या कमीत कमी ७५ टक्के इतकी असल्या बाबतचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

$$\text{वार्षिक किंमत} = \frac{\text{कामांची एकुण किंमत}}{\text{कामाचा कालावधी वर्षात}}$$

कंत्राटदाराची निविदा भरण्याची सक्षमता ( बीड कॅपेसिटी ) सनदी लेखापाल यांचेकडून प्रमाणित करुन सादर करावे.

बीड कॅपॅसिटी= ( अे × एन × २) - बी

अे –गेल्या पाच वर्षातील जास्तीत जास्त वार्षिक उलाढाल( चालुदराने )

एन- देय कामाचा कालावधी

बी -हातातील कामाची किंमत ( देय कामांच्या कालावधीतील )

१०. निविदाधारकाने ई निविदा सादर करतांना तांत्रिक लिफाफयातील कागदपत्रे अपलोड करण्यापुर्वी सर्व कागदपत्रांवर डिजिटल स्वाक्षरी व पानक्रमांक ( उदा. १/२० ते २०/२०)नमूद करणे अनिवार्य आहे. अन्यथा सदर निविदाग्राहयधरण्यात येणार नाही.

११. **करारनामा- करारनामा करतांना** पेपर महाराष्ट्र शासन राजपत्र दि.१४/१०/२०२४ मधील तरतुदीनुसार रुपये 5.00 **लक्ष पर्यंतचे कामांना रुपये 1000/- चे मुद्रांकावर करणे बंधनकारक आहे. तसेच रुपये 5.00 लक्ष वरील मूल्य असलेल्या कामांना प्रत्येकी रुपये 1.00 लक्ष साठी रुपये 300/- प्रमाणे स्टॅम्प पेपर देणे आवश्यक आहे.**

१२. **निविदेतील बी -1 पुस्तकातील पान क्रमांक 59,60,61 व 62 मधील सर्व माहिती स्वतंत्र तक्ता निविदे सोबत अपलोड करणे बंधनकारक राहील.**

१३. निविदेत भरलेले सर्व Afidavite केलेले मुद्रांक पेपर हे निविदा प्रसिध्द झालेल्या दिनांक कालावधीतील असणे बंधनकारक आहे.

१४. निविदा प्रक्रिया संपुर्ण संगणीकृत असलेने ई- प्रणालीव्दारे निविदा उघडलेचा मॅसेज ऑनलाईन येतो, तो पाहण्याची जबाबदारी निविदाधारकाची असून त्याबाबतची स्वतंत्र कोणताही पत्रव्यवहार अथवा भ्रमणध्वणीवर कळविले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

➢ **तांत्रिक लिफाफा सूचनाः-**

१. शासनाकडुन लाग होणा-या कराबाबत कुठलाही आक्षेप स्विकारला जाणार नाही. तसेच निविदा प्रक्रिया चालु असताना किंवा कार्यारंभ आदेश दिल्यानंतरही कर रचनेत शासनाकडुन काही बदल केल्यास ते लागु राहतील. GST दरामध्ये शासन मार्गदर्शक सुचनानुसार वेळोवेळी वाढ किंवा घट होऊ शकते आणि असे होणारे बदल कंत्राटदाराने मान्य करणे बंधनकारक राहील.

२. एखादया कामा बाबत निविदाधारकास आक्षेप नोंदवायचे असल्यासत्याने सदर आक्षेप निविदेचे तांत्रिक लिफाफा क्रमांक २ उघडल्यानंतर २ दिवसांच्या आत( ४८ तासांत ) नोंदविणे बंधनकारक आहे. त्यानंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

३. ई-निविदा प्रणालीमध्ये आवश्यक असलेला दस्तऐवज ऑनलाईन पध्दतीनेच PDF स्वरुपात सादर करावेत. कामाच्या निकडी नुसार निविदा कामांचे आवश्यक दस्त ऑफलाईन पध्दतीने मागविणेचे खाते चे अधिकार सुरक्षित ठेवण्यात येत आहे.

४. निविदेतील भरलेले सर्व Affidavit केलेले मुद्रांक पेपर हे निविदा प्रसिध्द झालेल्या दिनांक कालावधीतील तसेच **कामाचे नाव व टेंडर आय डी. मुद्रांक पेपरच्या दर्शनी भागवर नमुद** असणे बंधनकारक आहे.

५. निविदेतील रस्त्यांच्या डांबरी करणाच्या कामां मध्ये कंत्राटदारां कडुन शासन अंगीकृत तेल कंपन्यांच्या रिफायनरीतून डांबर उपलब्ध करुन दिल्या बाबत सादर करण्यात येणा-या इनव्हाईस / मुळगेटपास / चलनाची सत्यता पडताळणी

सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय २७/०३/२०१९ अन्वये संबंधित कंत्राटदार पुर्ण पणे जबाबदार असतील.

६. विभागाने प्रसिध्दकेलेल्या निविदेतील कामामध्ये SSR मध्ये नमूद असल्या प्रमाणे आवश्यक बाबीसाठी प्रणालीचा दर देण्यात आलेला असेलतर सर्व कंत्राटदारांना SCADA प्रणालीचा वापर बंधनकारक राहील. यास्तव काम करताना SCADA प्रणालीचा वापर झाला नाही तर देयक पारीत करताना सक्षम अधिकारी यांचेकडुन कळविलेल्या SCADA प्रणालीच्या दरानुसार देयकातुन वसुली करण्यात येईल. व याबाबत कार्यकारी अभियंता बांधकाम यांना संपूर्ण अधिकार राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

७. शासन निर्णय परिपत्रक क्र.२०१८/पारा/कार्या १९८/बांध-४ दि.१२/१०/२०१८ अन्वये निविदाधारकाने कामगार कल्याण मंडळावर कर्मचा-यांची नावे नोंदवली गेलेली असावीत.

८. अपलोड केलेल्या कागदपत्राची तपासणी करताना मुळ कागदपत्रे सारखे आढळुनन आल्यास ठेकेदार शिक्षेस पात्र होईल व आवश्यकता वाटल्यास पोलीस कार्यवाही केली जाईल.

९. लिफाफाक्रमांक १ मधील सर्व कागदपत्रांची छाननी करुन सदरचे छाननीमध्ये पात्र ठरलेल्या कंत्राटदारांच्या दराचा लिफाफा क्रमांक २ उघडण्यात येईल.

## ➢ आर्थिक लिफाफा :-

1. कंत्राटदारांनी आपल दर विहीत BOQ मध्ये योग्य त्या जागी नोंदवुन सदरची BOQ लिफाफा क्रमांक २ मध्ये अपलोड करावी. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रित्या निविदेचे दर इतर कोठे ही नमूद करण्यात येऊ नये.

2. कंत्राटदाराने अंदाजपत्रकीय दराच्या १० टक्के पेक्षा कमीदर भरल्यास अतिरिक्त इसारा रक्कम /कामगिरी सुरक्षा ठेव रकमेची बँक भुतीहमी निविदेसोबत सादर करणे बंधनकारक राहील. निर्धारित रकमेपेक्षाकमी रकमेची बँक प्रैत भुतीहमी सादर केल्यास अथवा आवश्यक बँक प्रति भूती हमी सादर न केल्यास सदर कंत्राटदाराची निविदा रद्द करण्यात येईल. शासन परिपत्रकानुसार लिफाफा क्रं. १ व लिफाफाक्रं. २ उघडल्यानंतर प्रथम न्युनतमदेकार सादर करणाऱ्या एल १ निविदाकाराने अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम आठ दिवसात कार्यकारी अभियंता यांच्याकडे जमा करावी. विहित मुदतीत अतिरिक्त सुरक्षा अनामत रकमेचा भरणा केला नाही तर एल २ निविदा काराला लेखी विचारणा करुन एल २ निविदा कारएल १ पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा मंजुर करण्यात येईल.

   **उदा. १९ टक्के कमी दरासाठी खालीलप्रमाणे पृथकरण**

   १० %कमी दरापर्यंत- १%

   १५ %कमी दरापर्यंत-(१५% - १०%= ५%)

   १५ %ते १९%कमी दरापर्यंत– (१९% - १५ % = ४% ) करिता ४× २ = ८%

   १% + ५% + ८% = १४%

3. निविदाधारकाचे आर्थिक दर उघडल्यानंतर देकार अंदाजपत्रकीय रकमेच्या १० टक्के पेक्षा कमी दराचा असल्यास अश ादर भरणा-या निविदाधारकांनी त्यांचे दर आर्थिक दृष्टयादर पृथ करण करुन समर्थनार्थ असल्याचे अभिलेखे दोन दिवसाच्या आत कार्यालयात सादर करावे.

## ➢ सामान्य सूचना

1. निविदे मध्ये फरक भाववाढ अनुज्ञेय राहणार नाही.
2. **कामगारांचा विमा**- महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्रं. संकीर्ण-2018/प्र.क्र.47/विमा प्रशासन दि. 13/07/2022 अन्वये कंत्राटी कामाचा विमा संबंधित कंत्राटदार यांनी विमा संचालनालयाकडे विमा उतरविणे बंधनकारक आहे. कंत्राटी कामाचा विमा' विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, गृहनिर्माण भवन, 264, पहिला मजला, कलानगर समोर, वांद्रे (पूर्व) मुंबई-400051 (दुरध्वनी क्रमांक 26590403/ 26590690 व फॅक्स

क्रमांक 26592461)' या कार्यालयाकडे विमा उतरविणे बंधनकारक आहे. कंत्राटी कामापोटी कंत्राटदारास रक्कम प्रदान करण्यापुर्वी कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा योग्य प्रकारे विमा संचालनालयाकडे उतरवुन पुरावा सादर केल्यानंतरच कंत्राटी कामापोटीची देय रक्कम प्रदान करण्यात येईल. कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा उतरविल्याचा पुरावा संबंधित कार्यालयास सादर केला नाही तर संबंधित कार्यालय कंत्राटी कामाच्या मुल्याच्या 1 टक्के या दराने कंत्राटदाराच्या प्रथम देयकातुन रक्कम दंड म्हणून कपात करण्यात येईल.

३. **दोष निवारण दायित्व कालावधी (Defect Liability Period)**-महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकामविभाग शासननिर्णयदिनांक १४/०१/२०१९ अन्वये खालील प्रमाणे राहील.

**अ) इमारती**

**१ ) मुळ बांधकामे**

१.१) आर.सी.सी फ्रेमचे बांधकाम :- १० वर्ष

१.२) लोड बेअरींगचे बांधकाम :- १० वर्ष

१.३) जल प्रतिबंधकउपाय योजना :- ७ वर्ष

**२) दुरुस्ती**

२.१ )विविक्षित /भांडवली स्वरुपाची दुरुस्ती (SDR/CTR):- ५ वर्ष

२.२) विशेष दुरुस्ती (Special Repairs):- २ वर्ष

२.३) किरकोळ दुरुस्ती (Current Repairs):- १ वर्ष

**ब) रस्ते**

१ डांबरीकरण/ Flexible Pavement

१.१ संकल्पनानुसार पुर्णतरतुदकरुन बांधकाम :- ५ वर्ष

१.२ मजबुतीकरण/पुर्ण लांबी मध्ये किमान दोन थर- MPM/BM :- ३ वर्ष

१.३ DBM चा १ थर व त्यावरB.C/ O.G.C चा थर किंवा संकल्पनानुसार पहिल्या टप्प्याचे बांधकाम(Stage Construction) :- ३ वर्ष

१.४ फक्त डांबरी नुतनीकरण— पुर्णलांबीमध्ये एक थर :- २ वर्ष

१.५ भागाभागातpatches of MPM/BM/DBM चा १ थर व त्यावर पुर्ण लांबीतB.C/O.G.C चा थर :- २ वर्ष

**२ कॉक्रीटीकरण / Rigid Pavement**

२.१ संकल्पनानुसार ३० से.मी किंवा त्यापेक्षा जास्त जाडी :- १० वर्ष

२.२ संकल्पन न करता केलेल्या पायवाटा, गावांतर्गत रस्ते व अन्य रस्ते :- ३ वर्ष

२.३ कॉंक्रीट पेव्हर ब्लॉक वापरुन केलेले कामे :- ५ वर्ष

**३ रस्तेखडीकरण:- १ वर्ष**

**४ रस्ते किरकोळ दुरुस्ती**

४.१ डांबर मिश्रित खडीनेखडडे भरणे ,चुनागेरु रंगविणे : (डिसेंबर ते जुन) नजिकच्या पावसाळयात पर्यंत

४.२ आय.आर.सी. मानकानुसार बसविलेले फलक :- ५ वर्ष

४.३ मार्गिकादर्शक व इतर थर्मोप्लास्टीक पेंट :- ३ वर्ष

**क) पुल व मो-या**

**१ मुळ बांधकाम**

१.१ पुलाचे बांधकाम :- २० वर्ष

१.२ स्लॅबड्रेन व पाईप मो-या :- १० वर्ष

१.३ काँकीटच्या बांधी व गटारी Bulilt Up Gutter :- १० वर्ष

**<u>२ दुरुस्ती</u>**

२.१ विशेष दुरुस्ती - बेअरींग बदलणे, प्रसरण सांधे बदलणे, पॅरापेट वॉलची पुनर्बांधणीकरणे, पाईप रेलींग बसविणे, पिअर / अबटमेंटलाजॅकेटींगकरणेइत्यादी :- ५ वर्ष

२.२ पुलावरील वेअरींगकोर्स :- ५ वर्ष

२.३ पुलाचेइपॉक्सी पेंटने पेटींगकरणे व तत्समदुरुस्तीकरणे :- ३ वर्ष

तथापि दोष दायित्व कालावधी पुर्ण झाल्यानंतर कामाची गुणवत्ता तपासणी करुन संपूर्ण सुरक्षा ठेव रक्कम परत करण्यात येईल. दोष निवारण कालावधीत सदर काम चांगल्या अवस्थेत आहे असे संबंधित उप विभागाचे प्रमाणपत्र तसेच आवश्यक्ठ कागदपत्रे सादर केल्याशिवाय सुरक्षा रक्कम परत केली जाणार नाही

४. **बांधकाम मुदतवाढ**- निविदेतील कामाबाबत कंत्राटदारास मुदतवाढ आवश्यक असल्यास कंत्राटदाराने प्राप्त कामाचा कालावधी संपण्यापुर्वी १५ दिवस अगोदर विभागास पत्रव्यवहार करणे अपेक्षित आहे. मुदतवाढी संदर्भात सबळ कारण असेल तर कार्यकारी अभियंता हे मुळ मुदतीच्या २५ टक्के पर्यंतचा कालावधी मंजुर करतील. त्यापुढील मुदतवाढीसाठी कार्यकारी अभियंता हे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखी शिफारस करतील. मुदतवाढ प्रस्ताव कंत्राटदाराने सुरुवातीची कालमर्यादा किंवा वाढवून दिलेली कालमर्यादा संपण्यापुर्वी मंजुर करुन घेणे बंधनकारक आहे. अशा मर्यादेनंतर मंजुर केलेली वाढ वैध असणार नाही. सबळ कारण असल्याखेरीज निविदेनुसार दिलेल्या कालावधीत काम पूर्ण न केल्यास कंत्राटदारास करारनाम्यातील बी-१Clause २ मध्येनमूद असल्याप्रमाणे प्रतिदिन १ टक्केच्या कमाल मर्यादेत विलंब कालावधीमधील उर्वरित कामकाजाच्या रकमे वरती दंड आकारण्यात येईल.तथापि, विलंब संदर्भातील कारणांचा विचार करता गुणवत्ते नुसार दंडाची रक्कम कमी जास्त करण्याबाबत मा. अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी यांचेमार्फत आदेश पारीत केले जातील व ते अंतिम असतील.

५. **दंडात्मककार्यवाही -** महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रं. ग्रासयो-2021/ प्र.क्र.108/ बांधकाम-2 दि. 07/12/2021 अन्वये ग्राम विकास विभागांतर्गत कामे करणा-या कंत्राटदाराचे त्यांनी केलेल्या कामाच्या दर्जामध्ये त्रुटी आढळल्यास सदर कंत्राटदारावर कारवाई करण्यात येईल.(उदा. सक्त ताकीद देणे, पदावनती नाव नोंदणी यादीतुन काढुन टाकणे, फौजदारी गुन्हा नोंदविणे इ. ) अपलोड केलेली कागद पत्रे कोणत्याही टप्प्यावर खोटी आढळल्यास संबंधित निविदाधारक / कंत्राटदारावर निविदेच्या कामाच्या कोणत्याही टप्प्यावर निविदा रदद अथवा पुर्नपडताळणी करण्याची योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

६. **माहिती फलक**- प्रत्यक्ष कामाच्या जागी विहित कामाची माहिती दर्शवणारे फलक तातडीने बसविणे बंधनकारक आहे. या माहिती फलकामध्ये कंत्राटदाराचे नाव, कार्यारंभ आदेश, कामाचा खर्च, काम पूर्ण करावयाचा दिनांक, दोष निवारण कालावधी या सर्वांचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक राहील असे नमूद आहे.

७. आर्थिकलिफाफा उघडल्यानंतर ठेकेदारास माहिती स्वयंचलित संगणक प्रणाली (वेबसाईट व्दारे) नोंदणीकृत दुरध्वनीवर (मोबाईल) पाठवली जाईल व ते ऑथक लिफाफा पाहु शकतील त्या करीता दुसरी कोणतीही कार्यवाही किंवा पत्रव्यवहारकेला जाणार नाही. यशस्वी व सर्वात कमीदर असणा-या ठेकेदाराने लागणारी कागदपत्रे आणि बी-१ मधील विशिष्ट करार नाम्यासहित अनामत रक्कम,कामगारांचा विमा निविदा उघडल्यानंतर १५ दिवसात सादर करावा जर निविदाधारकाने मदतीत कागदपत्रे सादर केली नाहीत तर त्याचा निविदेवर हक्क राहणार नाही. सबंधित निविदाधारकावर नियमोचित कारवाई करण्यात येईल. तद्नंतर कालक्रमानुसार दुसरा निविदाधारकास बोलविण्यात येईल, वाटाघाटीसाठी आणि वाटाघाटी नुसार जर त्यांनी पहिल्या निविदाधारका पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असेल अशा दुस-या निविदाधारकास काम देण्यात येईल.

**<u>निविदा उघडणे व तपासणीकरणे</u>**:-

**निविदा मुल्यांकन समिती:-**निविदा मुल्यांकन समिती शासननिर्णयक्र.एमआयएससी/२०१० /२७५/सीआर /पॅरा-७/११ दि.१९/१०/२०११ अन्वये निविदा कागदपत्रे प्रसिध्द करण्याकरीता व कागदपत्रांची तपासणी करण्या करीता तयार करण्यात आली असून निविदेच्या कामाच्या ठेकेदाराची कागदपत्रांची तांत्रिक मुल्यांकन व आर्थिक मूल्यांकन करण्या करीता कार्यरत राहील.

**तांत्रिक लिफाफा उघडणे:-**

१. तांत्रिक लिफाफा शासनाच्या ठरावा नुसार निविदा समिती सदस्यांनी किंवा त्यांनी अधिकृत केलेल्या कर्मचा-यामार्फत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने, दिलेल्या वेबसाईट वरुन डिजीटल स्वाक्षरी प्रमाणपत्राने उघडलाजाईल.
२. निविदा धारकांनी इच्छा असल्यास निविदा उघडते वेळीते उपस्थित राहु शकतात.
३. तांत्रिकदृष्टया वैधानिक कागदपत्रासाठी तांत्रिक लिफाफा प्रथम उघडले जाणे आवश्यक जाणे आहे. कागदपत्रामध्ये काही कमतरता असल्यास संबंधित निविदाधारकाची निविदा नाकारली जाईल.
४. अवैधााक लिफाफयातील कागदपत्रे डिक्रिप्ट( वाचनीय स्वरुपात रुपांतरीत) डाऊनलोड केली जातील आणि निविदा मूल्यांकन समितीकडे सादर केली जातील.
५. निविदा धारकाने सादर केलेली निविदा कागदपत्रांची फेर तपासणी निविदा मुल्यांकन समिती करु शकते.

**तांत्रिकदृष्टया पात्र निविदाधारकांची यादी प्रसिध्दकरणे :-**तांत्रिक मूल्यांकन समितीच्या छाननी व निर्णयाच्या अनुषंगाने पात्र निविदाधारकांची सारांश यादी आणि त्यांच्या अनुक्रमांकानुसार कामाचे आर्थिक प्रस्ताव विचारात घेऊन ते वेबपोर्टलवर अपलोड केले जातील.

**निविदा उघडणारे सक्षम प्राधिकरण** :-

**नाव/पद/ ई-मेल आयडी**

| | | |
|---|---|---|
| BO 1* | मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर | ceonagar_anr@rediffmail.com |
| BO 2* | अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर | ceonagar_anr@rediffmail.com |
| BO 3* | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर | zpnagar_cafo@rediffmail.com |
| BO 4* | कार्यकारी अभियंता, सा.बां.दक्षिणविभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर | eebcs_nagarzp@rediffmail.com |
| BO 5* | संबंधितखातेप्रमुख, जिल्हा परिषद अहिल्यानगर | eemi_nagarzp@rediffmail.com |

दि.१९/१०/२०११ च्या शासननिर्णयानुसार निविदा उघडतांना BO 1* किंवा BO 2* आणि BO 3*व ,BO 4*,BO 5* पैकी एक उपस्थीत असावेत.निविदा समिती निविदेची छाननी तपासणीकरताना, संबंधित निविदाधारकास स्पष्टिकरण मागु शकते. जादा कागदपत्रांची मागणी करु शकते किंवा त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची मुळ प्रत मागू शकते. निविदाधारकाने आवश्कागद पत्राहित कालावधीत सादर न केल्यास, त्याची निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

**अपील करण्याची तरतूद व त्याचा निकाल:-**

१) निविदा मूल्यांकन समितीचा निर्णय, एखाद्या निविदाधारकास मान्य नसेल, तर तो लेखी स्वरुपात (फॅक्स/ई मेलकिंवा स्पीड पोस्ट) मुख्यकार्यकारी अधिकारी/अति.मुख्यकार्यकारी अधिकारी यांचेकडेस, पात्र निविदाधारकांची यादी अपलोड केलेल्या तारखेपासुन २४ तासांचे आत अपील करु शकतो. सदर अपीलाची प्रत कार्यकारी अभियंता सा.बां.दक्षिण /उत्तर, ग्रापापु, लपाविभाग यांनाही पाठवावी लागेल.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी/ अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अहमदनगर (अपिलीय प्राधिकरण) यांनी समितीचा निर्णय व अपिलकर्ता यांचे म्हणने ऐकूण अपिलाचा निवाडा करुन, तसे संबंधित निविदा धारकास कळविण्यात येईल.

**तांत्रिक दृष्टया पात्र निविदाधारकांची यादी अंतिम रित्या प्रसिध्द करणे :-** अपिलीय प्राधिकरणाने जर निविदा मागविलेल्या विभागास अपिल केलेल्या निविदा धारकाची निविदा स्विकृत करणे बाबत सूचना केली तर, आवश्यक शुध्दीपत्रक काढुन, पात्र निविदा अपलोड करण्याची प्रक्रिया परत करण्यात येईल. ऑथक लिफाफा उघडण्याची तारीख अंतिम गोषवारा यैंदीत नमुद केली जाईल.

**ऑथक निविदा उघडणे व मूल्यांकन करणे** :-

१. निविदा मूल्यांकन समितीने, तांत्रिकदृष्टया पात्र ठरलेल्या निविदाधारकांचा आर्थिक प्रस्ताव, संकेत स्थळावरून इलेक्ट्रॉनिक पध्दतीने उघडण्यात यावा. सदर आर्थिक प्रस्ताव निविदाधारकाची अंतिम यादी प्रसिध्द केल्याचे तारखेनंतर विहीत मुदतीत उघडणेत येईल.
२. सदर गोपनीय प्रती खुल्या केल्या जातील व नमूद केलेले दर निविदाधारकांना वाचण्याकरीता उपलब्ध केले जातील.
३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी आवश्यक अभिप्राय दिल्यानंतर व तपासणी केल्या नंतर दरांचा तुलनात्मक तक्ता, कार्यकारी अभियंता / खाते प्रमुख जि.प.यांचेकडुन अपलोड केला जाईल. या तक्त्यांमध्ये कंत्राटदाराचे नाव प्रत्येक कामासमोर त्याने नमूद केलेला दर इत्यादी तपशील असावा,परंतु प्राप्त दर हे योग्य वाजवी आणि अजुन कमी होण्यास वावनसल्याची खातर जमा केलेली असावी
४. पात्र व अंतिम निविदाधारकांची यादी वेब पोर्टलवर शुध्दीपत्रकाद्वारे अपलोड करण्यात येईल.
५. निविदा स्विकृती प्राधिकरण कोणत्याही निविदा धारकास त्यान नमुद केलेल्या दर योग्य आहेत का याचे पृथःकरण करण्यास सांगु शकते.

**निविदा स्विकृती**:-सर्वात कमी पात्रदराची निविदा स्वीकारण्यात येईल. परंतु निविदा स्विकृती प्राधिकरण/ कार्यकारी अभियंता यांच्या वर ते बंधनकारक नाही व कोणतीही किंवा सर्व निविदा योग्य कारणास्तव फेटाळण्याचे अधिकार राखुन ठेवले आहेत**.**

**निविदा स्विकृतीनंतर अतिरिक्त बयाणा रक्कम/सुरक्षा अनामत रकमेची अदायगी**:-ज्या निविदाधारकाची निविदा स्विकृतीसाठी पात्र ठरलेली आहे, त्याने निविदा स्विकृतीचे पत्र मिळाल्यानंतर दहा दिवसाच्या आत बॉड पेपरवर करारनामाविहीत प्रतीत कार्यकारी अभियंता यांना करुन दयावयाचा आहे. सदर करारनामा शासनाच्या प्रचलित नियम/निर्णयानुसार किमतीचा असावा.यशस्वी निविदाधारकांनी २ टक्के अनामत रक्कम राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचे ठनावें असलेला बंद लिफाफ्यात सादर करावाचा असुन निविदेची सर्व कागदपत्रांची पर्तता करावयाची आहेत.

**अयशस्वी निविदाधारकाची बयाना रक्कम परत करणे** :- अयशस्वी निविदाधारकाने भरलेली बयाना रक्कम परत मिळणेसाठी संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडे, कामाचेनांव, तपशिल, निविदाक्रमांक , तारीख, बयाना रक्कम भरलेली पध्दत व रक्कम इत्यादी तपशिलासह अर्ज करावयाचा आहे. दराच्या तुलनात्मक तक्त्यानुसार स्विकृत केलेला सर्वात कमी दराचा निविदाधारक वगळता, इतर सर्व निविदाधारकांची बयाणा रक्कम परत करण्यात येईल.

**देयक अदायगी**:-कोणतेही काम झालेनंतर केलेल्या कामाच धावते किंवा अंतिमदेयक , निधी उपलब्धतेनुसार अदा करणेत येईल. देयक अदायगी विलंबा बाबत कोणतेही कारण दिले जाणार नाही/ प्रस्ताव स्विकारला जाणार नाही.

**साहित्य पुरवठा**:-कामासाठी लागणारे सर्व प्रकारचे साहित्य कंत्राटदाराने स्वखर्चाने आणावयाचे आहे.

**विहित तारखांचे वेळापत्रकः-<u>टीप</u>-** दिवस म्हणजे शनिवार-रविवार -सरकारी सुट्टया वगळुन कार्यालयीन कामाचे दिवसतांत्रिक/ आर्थिक निविदा उघडण्याच्या तारखा संभाव्य आहेत.

निविदेची पुर्ण प्रक्रिया ऑनलाईन (ई टेंडरींग) पध्दतीनेकेलीजाईल. शासनाच्याhttp://mahatender.gov.inया संकेतस्थळावरुन, निविदा कागदपत्रे डाऊनलोड करण्याबाबत मार्गदर्शनपर सुचना आणि ऑनलाइन निविदा सादर करणे व निविदा उघडणेची कार्यपध्दती डाऊनलोड करता येईल.

http://mahatender.gov.in या संकेतस्थळावरुन विहित तारखेनुसार तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा मा.अति.मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प.अहमदनगर यांचे कार्यालयात ऑनलाईन उघडल्याजातील.

निविदाधारकाने सादर केलेली निविदा, निविदा उघडण्याच्या तारखेपासुन १२० दिवस वैध राहील. निविदा अर्जातील सर्वसाधारण नियमातील परिच्छेदक्र-१ पहा.

यशस्वी कंत्राटदाराने कार्यकारी अभियंता यांनी निर्देशित केल ेनुसार सुरक्षा अनामत रक्कम विहित वेळेत जमा केली नाही व निविदेतील करारनाम्यातील कागदपत्रांची पुर्तता केली नाही तर बयाना रक्कम जप्त केली जाईल. इतर वेळी बयाना रक्कम परत करता येईल.

**आराखडे व कामाचेठिकाणतपासणे** :- निविदा धारकाने स्वखर्चाने व काळजीपुर्वक आराखडे, निविदेतील अटी, निर्देश इतर यांची तपासणी करावी. त्याने कामाच्या जागेची पाहणी करावी व तेथील वातावरण भौतिक/इतर परिस्थीती/निसर्ग, अस्तीत्वातील व आवश्यक तपासणी, दळणवळणाची साधणे, व गोडावुन माल साठवणुक जागा इतर बाबत स्वतः अवगत करुन घ्यावे.निविदेवर परिणाम,प्रभाव, होणा-या बाबीइतर परिस्थीती बाबत आवश्यक माहिती कंत्राटदाराने प्राप्त करुन घ्यावे. वरील बाबतीत कोणतीही भरपाई जिल्हा परिषद किंवा शासनाकडुन मिळणार नाही. निविदा कागदपत्रातील सुचना अथवा शंका अथवा संदिग्धता असेल तर, त्याने निविदा कालावधीच्या ३ दिवसात कार्यकारी अभियंता यांना लेखी पत्र दयावे. सदर निविदे बाबत आवश्यक्यता असल्यास कोणतेही शुध्दीपत्रक फक्तhttp://mahatender.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केले जाईल. कोणतीही किंवा सर्व निविदाकारणां शिवाय फेटाळणे किंवा रदद करण्याचा अधिकार सक्षम प्राधिका-याकडे राखुन ठेवण्यात आला आहे.

| अ.क्र. | प्रक्रियातपशिल(As Per Online Shedule) | दिनांक |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिध्द करणे, निविदा सुचना व निविदा कागदपत्रे अपलोड करावयाची तारीख | |
| २ | तांत्रिक व आर्थिक लिफाफा सादर करण्याची अंतिम तारीख | |
| ३ | तांत्रिक लिफाफा उघडण्याची तारीख | |
| ४ | तांत्रिकदृष्टया पात्र ठरलेले पात्र निविदाधारकांची यादी अपलोड करण्याची तारीख | |
| ५ | आर्थिक लिफाफा/निविदा उघडण्याची तारीख | |
| ६ | आर्थिकदृष्टया पात्र ठरलेले निविदाधारकांची यादी अपलोड करण्याची तारीख | |

**कार्यकारी अभियंता**
**जि.प.सा.बां.दक्षिण विभाग,**

**अति.मुख्य कार्यकारी अधिकारी**
अहिल्यानगर **जिल्हा परिषद** अहिल्यानगर

# Zilla Parishad Ahilyanagar

## STATEMENT NO.1

**Details Of Work Tendered For For& Hand as the Date Submisstion Of This Tender**

**Name Of The Tenderer :-** **Construction Concrete Road Chincholi Village Internal Bangarwadi, Ghodvakhare Vasti, Zanzad Vasti Road at Chincholi Tal. Parner Dist. Ahilyanagar.**

| Sr.no | Name of work | Place & Country | Work In Hand | | Anticipated Date Of Completion | Work tendered for | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Tendered Cost | Cost Of remaining work | | Estimated Cost | Date when decision is expected | Stipulated date or period of completion | Remarks |
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** |
| | | | | | | | | | |

# Contractor

# Zilla Parishad Ahilyanagar
## STATEMENT NO.2
**Details of work of similar type and magnitude carried out by the Contractor In the Last Three Years**

**Name Of The Tenderer :-**

| Sr.no | Name of work | **Cost Of Work** | **Date Of Starting** | **Stipulated date of completion** | **Actual date of completion** | **Remarks** |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| | | | | | | |

**Contractor**

# Zilla Parishad Ahilyanagar
## STATEMENT NO.3
**Details of Plant machinery immediately available With the tenderer for this work**

**Name Of The Tenderer :-**

| Sr.no | **Name Of equipment** | **No Of units** | **Kind and Make** | **Capactiy** | **Age & Condition** | **Present location** | **Remarks** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** |
| | | | | | | | |

**Contractor**

# Zilla Parishad Ahilyanagar
# STATEMENT NO.4
# Details of technical person available with Contractor

**Name Of The Tenderer :-**

| Sr.no | Name of work | Qualifications | Whether working in field in office | Experience of execution of similar works | Period for which person is working with the tendered | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | | |

## Contractor

Zilla Parishad **Ahilyanagar**

DECLARATION OF THE CONTRACTOR

(Declaration of the Contractor on Contractors Letter Head in pdf format)

Name of work :-

Tender Notice No :- E-Tender Notice No /2022-2023

I / We hereby declare that.

1. I/ We are interested in the above named work in the tender notice.
2. I/We have submitted a bid for the said work
3. I/We have made my self / ourselves thoroughly conversant with the local conditions regarding all materials and labor on which I/We have based my/our rates for this tender . The specifications and leads on this work have been carefully studied and understood befors submitting this tender. I/We undertake to use only the best materials approved by Executive Engineer, or this duly authorized assistant during execution of the work and to be abide by the decisions.
4. I/We accept all the terms and conditions laid in the tender document.
5. The rate quoted by me/us in unconditional ; I / We understand that conditional tender in liable for rejection.
6. I /We hereby declare that I/We Will made Alll the Payments to labours / staff are made in bank accounts of staff Linked to Unique Indetification Number (AADHAR CARD)

**Contractors Singnature**

प्रतिज्ञापत्र

(Black listed)

मी खाली सही करणारधारक श्री/श्रीम/मे------------------------------------------------------------- या व्दारे असे निविदन करतो की, मी कोणत्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयाकडून Black listed झालेला नसून जिल्हा परिषद **अहिल्यानगर** कडील निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्पावरBlack listed असल्याचे आपणास निदर्शनास आल्यास माझेवर नियमानुसार होणा-या कार्यवाहीस पात्र राहील.

दिनांक :-
ठिकाण :-

निविदा धारकाची स्वाक्षरी, शिक्का
पुर्ण पत्ता व संपर्कनंबर

-------------------------------------------------------------------------------------------------------------------

प्रतिज्ञापत्र

(अपुर्ण अथवा प्रलंबित कामे नसल्याबाबत)

मी खाली सही करणारधारक श्री/श्रीम/मे------------------------------------------------------------- या व्दारे असे निविदन करतो की, मी जिल्हा परिषद अहमदनगर अंतर्गत मला मिळालेली विविधविकास कामे विहित मुदतीत अथवा प्रथम वाढीव मुदत वाढ कालावधीमध्ये पुर्ण केलेली आहेत. कोणत्याही स्वरुप/ प्रकारचे कामे विहित मुदतीत अथवा प्रथम वाढीव मुदत वाढ कालावधीमध्ये अपुर्ण अथवा प्रलंबित नाहीत. असे मी प्रतिज्ञापत्र सादर करीत आहे. तथापि जिल्हा परिषद अहमदनगर अंतर्गत मला मिळालेली विविध विकास कामे पुर्ण केलेली नसल्याचे कोणत्याही स्वरुप/प्रकारचे कामे विहित मुदतीत अथवा प्रथम वाढीव मुदत ावाढ कालावधीमध्ये अपुर्ण अथवा प्रलंबित असल्याचे कार्यालयाचे निदर्शनास असल्यास सदर निविदा प्रक्रियेतील कोणत्याही टप्प्यावर अपात्र करुन माझेवर नियमानुसार होणा-या कार्यववाहीस पात्र राहील.

दिनांक :-
ठिकाण :-

निविदाधारकाची स्वाक्षरी, शिक्का
पुर्ण पत्ता व संपर्क नंबर

**परिशिष्ट– १**

**नमुना सत्य प्रतिज्ञापत्र (रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर)**

**सत्य प्रतिज्ञापत्र** (Affidavit)

मी ------------------------------------------------------------------------ वय वर्षे ------------- राहणार ------------ या सत्यप्रतिज्ञा पत्राव्दारे लिहून देतो की, मी ---------------------------------- या फर्मचा / कंपनीचा मालक असून --------------- ------------------------------------ या कामासाठी निविदा सादरकरीत आहे. त्या निविदेच्या लिफाफा क्र १ मध्ये जी कागदपत्रे सादर केली आहेत ती खरी , बरोबर व पूर्ण आहेत, त्यामध्ये कोणत्याही त्रृटी, चुका नाहीत, याची मी खात्री केलेली असून असे शपथ पूर्वक खालील अटी व शर्थीसह मान्य करीत आहे. या कागदपत्रांमध्य काही चुकीची, दिशाभूल करणारी, खोटी व तसेच अपूर्ण महिती आढळल्यास मी भारतीय दंड संहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

१. जर कंत्राट कालावधी दरम्यान मी, माझ्या कार्यालयाने किंवा माझ्या कर्मचा-यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला कोणतीही खोटी माहिती किंवा देयका समवेत सतेच पत्र व्यवहारात खोटी / बनावट साहित्य खरेदीची कागदपत्रे सादर केली असल्यास, मी भारतीयदंड संहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

२. जर कंत्राट कालावधी दरम्यान आणिकाम समाप्तीनंतर , अंतिम देयक देण्याच्या तारखेपर्यंत सादर केलेले कोणतेही कागदपत्रे खोटी / बनावट किंवा फसवी आढळल्यास , मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

३. जर काम समाप्ती नंतर दोष दायित्व कालावधी दरम्यान किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे खोटी / बनावट, फसवी किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

**कंत्राटदाराची सही / शिक्का**

Signature Not Verified

Digitally signed by SAGAR KISHOR CHAUDHARI
Date: 2026.05.07 15:56:35 IST
Location: Maharashtra-MH